# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई

*जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर*
*४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.*
*फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९ ई-मेल-* www.jdteromumbai.com


क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१३/ 1564
दिनांक

प्रति,
प्राचार्य/संचालक,
सर्व शासकीय/अनुदानित,
विनाअनुदानीत,पदवीका,पदवी व पदव्युत्तर पदवी
अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था (विभागा अंतर्गत सर्वसंस्था)

**विषयः**-या कार्यालयाच्या संकेतस्थळावरील (वेबसाईट) माहीतीबाबत

या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या सर्व पदवीका / पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणा-या सर्व शासकिय /शा. अनुदानित / खाजगी विना अनुदानित संस्थेच्या प्राचार्य / संचालक यांना कळविण्यात येते की, शासन / तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत प्राप्त होणा-या आदेशान्वये करावयाच्या कार्यवाहीसाठी या कार्यालयामार्फत कळविण्यात आलेली माहिती व परिपत्रके यांची अंमलबजावणी तातडीने होणे अपेक्षित असते.

परंतु असे निदर्शनास येते की बरेचदा संस्थेकडुन माहीती अथवा पत्राची कार्यवाही वेळेत या कार्यालयास प्राप्त होत नसल्यामुळे शासकीय कामात विलंब होतो.

तरी सर्व संस्थाचे संचालक / प्राचार्य यांना कळविण्यात येते की या कार्यालयामार्फत प्रवेश परीक्षा, प्रवेश संबंधीत सुचना व माहीती तसेच इतर महत्वाच्या माहितीबाबतची सुचना/परीपत्रके वेळोवेळी या कार्यालयाची वेबसाईट www.jdteromumbai.com वर प्रकाशीत करण्यांत येईल.

तसेच एखाद्या / ठराविक संस्थेशी संबधीत माहीती ही आपल्या प्राचार्य/संस्थेच्या E-mail वर पाठविण्यांत येईल.तरी सर्व संस्था प्रमुखांनी **तंत्रशिक्षण संचालनालयाची/ व या विभागीय कार्यालयाच्या संकेत स्थळावरील** प्रकाशीत केलेली माहीती प्राप्त करुन तसेच आपल्या संस्थेच्या **ई-मेल वर पाठविण्यात आलेल्या पत्रांची माहीती** प्राप्त करुन वेळोवेळी सादर करावयाच्या माहीतीची तातडीने अमंलबजावनी करुन या कार्यालयास पुढील कार्यवाही करण्याच्या दृष्टीने सहकार्य करावे.

तरी सर्व संस्था प्रमुखांनी नोंद घ्यावी. यापुढील प्रवेश / प्रवेश परीक्षा / विद्यार्थ्यांचे स्थलांतरण इत्यादी बाबतचे आदेश, व परिपत्रके तसेच इतर सर्व पत्रे वेबसाईटव्दारे/ ई-मेल व्दारे प्राप्त करुन घ्यावीत.

(जी.वी.धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई.